# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## प्रवेश सूचना २०२५-२०२६

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र) एम.कॉम., एम.एस्सी.(गणित), या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश अर्ज दि.२१.०५.२०२५ ते दि.१५.०९.२०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/login या लिंकवरून Student Registration Portal वर Distance Education Registration या tab वरून प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचे आहेत.

विद्यार्थीनी प्रवेश अर्ज भरताना व सादर करताना प्रवेश व त्याअनुषंगिक संदर्भातील सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. यासाठी प्रवेशित विद्यार्थ्याचा सर्व प्रथम स्वत:चा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. त्यानुसार इच्छुक विद्यार्थ्यानी सर्वप्रथम **Registration** मधील आवश्यक माहिती अचूक पध्दतीने (शेवटच्या परीक्षेत असलेले नावाप्रमाणे) सादर करावी. त्यानुसार विद्यार्थ्यानी **स्वत:चा ई-मेल आयडी हा युझर आयडी घेऊन पासवर्ड देवून त्यामधून आपला प्रवेश अर्ज सादर करणे आवश्यक आहे.**

२. सदर **Registration** झालेनंतर विद्यार्थ्यांनी आपल्या **युझर आयडी ( ई-मेल आयडी) मधून आपला प्रवेश अर्ज भरणेचा आहे. यामधून पुढील अभ्यासक्रमाची प्रवेश, परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाचा असल्याने सदर युझर आयडी ( ई-मेल आयडी) व दिलेला पासवर्ड आपल्याजवळ कायम असणे आवश्यक आहे.**

३. प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्जाच्या एक प्रतीवर स्वाक्षरी करावी.

४. विद्यार्थ्यांनी प्रवेशाअर्जासोबत यापूर्वीची व पात्रता पूर्ण करीत असलेल्या कागदपत्रांची स्वसांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक आहे. **शैक्षणिक अर्हतेची कोणतेही मुळ कागदपत्रे अर्जासोबत जोडू नयेत.**

५. विद्यार्थ्यांनी प्रवेश ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज व कागदपत्रांची हार्ड प्रत तात्काळ विहित मुदतीत दि.२० सप्टेंबर २०२५ पर्यत सादर करणे आवश्यक आहे. **ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत, शुल्क व कागदपत्राची हार्ड प्रत विहित मुदतीत सादर न केल्यास आपला प्रवेश निश्चित/अंतिम समजला जाणार नाही.**

६. पदवी (बी.ए., बी.कॉम.) वर्षासाठी प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांनी १२ वी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची छायांकीत प्रत व शाळा सोडल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

७. एम.ए. एम.कॉम., एम. एस्सी. (गणित) एम.बी.ए. डिस्टन्स साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पात्रता समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

८. सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत संस्थातर दाखला (T.C.), संस्थांतर दाखला (M.C.), स्थलांतर दाखला आधार कार्ड, ए.बी.सी. आयडीची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

९. प्रवेश अर्जासोबत अभ्यासक्रम पात्रतेची गुणपत्रिक, संस्थातर दाखला, स्थलांतर दाखला व ए.बी.सी./अपार आयडी तसेच डी.ई.बी. आय.डी. ची प्रत न जोडल्यास आपला प्रवेश निश्चित/अंतिम समजला जाणार नाही. तसेच त्याची पात्रता अंतिम करता येणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१०. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा उल्लेख प्रवेश अर्जावर नमूद करावा.

११. **प्रवेश अर्जासोबत संस्थातर दाखला (T.C.), स्थलांतर दाखला (M.C.), व ए.बी.सी. आयडीची प्रत न जोडल्यास त्यानी याबाबतची पूर्तता प्रवेश अर्ज सादर केल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करावी अन्यथा आपला प्रवेश अंतिम होणार नाही अथवा आपला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल, याची पूर्णतः जबाबदारी आपणावर राहील नोंद घ्यावी. संस्थातर दाखला (T.C.), स्थलांतर दाखला (M.C.), प्रवेशाअर्जावेळी सादर केला नसल्यास ते दाखले एक महिन्याच्या आत सादर करणेबाबत हमीपत्र प्रवेश अर्जासोबत सादर करावे. त्यानुसार (T.C.) संस्थातर दाखला व (M.C.), स्थलांतर दाखला जमा/सादर करताना विद्यार्थ्यांनी अर्जात अथवा त्या दाखल्यामागे कोणत्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव, पी. आर.एन, नांवात बदल असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.**

१२. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच्या या विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील टी.सी. (T.C.) चा अर्ज भरून या केंद्राचा अभिप्राय/शेरा घेवून तो अर्ज विद्यार्थी सुविधा केंद्राकडे सादर करणेचा आहे.

१३. **विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच परीक्षा केंद्र असते.** तथापि परीक्षा केंद्र देण्याचा अंतिम संपूर्ण अधिकार हा विद्यापीठाकडे राहिल याची नोंद घ्यावी.

१४. विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगीनमधून प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचा आहे. इतर माध्यमातून प्रवेश व शुल्क भरल्यास तो ग्राहय अथवा स्वीकाराला जाणार नाही अथवा त्यांचा प्रवेश निश्चित समजला नाही.

१५. **विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन भरताना आपले नांव शेवटच्या गुणपत्रकावर असलेप्रमाणे भरावे.** तसेच आपला पत्ता, अभ्यासकेंद्राचे नाव, ई मेल आयडी, मोबाईल क्रमांक, अभ्यासक्रम, आधार क्रमांक, ए. बी. सी. आयडी. क्रमांक/अपार आय.डी. विषय, आधारकार्ड, अचूक पध्दतीने काळजीपूर्वक भरावे.

१६. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर अनुषंगिक बाबीसंदर्भात आपल्या अभ्यासकेंद्राशी समन्वय साधून पूर्तता करणेची आहे.

१७. प्रवेश, पात्रता, परीक्षा व इतर अनुषंगिक बाबीसंदर्भातील परिपत्रके व सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in/distedu/(Online Notice Board) ठेवल्या जात असतात. विद्यार्थ्यांनी आपले **प्रवेश झाल्यानंतर सदरच्या बाबीसंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळवरून माहिती घेणे आवश्यक आहे.**

१८. मुख्यालयात **विषयनिहाय तज्ञ प्राध्यापक कार्यरत असून** विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात ऑनलाईन पध्दतीने **विषयनिहाय** समुपदेश केले जाते. यासाठी **विद्यार्थ्यांनी व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यामातून विषयनिहाय शैक्षणिक मार्गदर्शनासाठी व इतर सूचनासंदर्भात सहभागी व्हावे.**

१९. दुहेरी पदवी योजनेअंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवीचा अर्ज व शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. दुहेरी पदवीवर आवश्यक ठिकाणी इतर

ठिकाणी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे प्राचार्य यांची सही व शिक्का घेवून तो ऑनलाईन अर्ज व शुल्काची पावती व इतर अनुषंगिक कागदपत्रे या केंद्राच्या कार्यालयात विहित मुदतीत सादर करावा. सदर अर्जावर विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राच्या ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे, त्या अभ्यासक्रमांच्या फॅक्ल्टीची सही व शिक्का घेवून सदरची फी सादर करणे आवश्यक आहे. सदरची लिंक ही विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर पुढील प्रमाणे आहे.

(https://sukapps.unishivaji.ac.in/dualdegree_application/#/login)

२०. **प्रवेश अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

१. पात्रतेनुसार सदर अभ्यासक्रमांच्या गुणपत्रकाची छायाकिंत प्रत
२. संस्थातर दाखला (T.C.)
३. स्थलांतर दाखला (M.C.) (लागू असलेस)
४. संस्थातर दाखला/संस्थातर दाखला नसल्यास प्रवेश घेतलेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आत सादर करणेबाबत हमीपत्र
५. आधार कार्ड
६. ए. बी. सी / अपार आय.डी व डी.इ.बी. आयडी ची प्रत (नसेल तर डिजी लॉकर ॲप)
७. ऑनलाईन प्रवेश अर्ज व शुल्काची पावती
८. दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेतला असेल तर दुहेरी पदवीची ऑनलाईन अर्जाची परिपूर्ण व शुल्काची प्रत. ते नसल्यास दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेतले असल्याबाबतचे हमीपत्र.

२१. **विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या मार्गदर्शक सूचेनुसार परीक्षेचा सत्रनिहाय परीक्षा अर्ज व शुल्क त्यांच्या लॉगीनमधून आपले विषय निश्चित करून स्वंत्रत भरणेचा आहे. सदर अर्ज व शुल्क विहित मुदतीत न भरल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

२२. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी ज्या युझर आयडी (ई-मेल आयडी) नुसार प्रवेश अर्ज भरला आहे त्या युझर आयडी मधून परीक्षा विभागाच्या सूचेनुसार परीक्षा अर्ज व शुल्क भरणेचे आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. याकरता विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाकडून परीक्षा संदर्भातील वेळापत्रके, परिपत्रके व सूचना विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या संकेतस्थळावर **https://www.unishivaji.ac.in/exam/** ठेवली जातात. याकरीता विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळावर भेट द्यावी व त्यानुसार आवश्यक बाबींची पूर्तता विहित मुदतीत करावी.

२३. प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश आणि परीक्षा सूचनासंदर्भात आपण आपल्या अभ्यासकेंद्राशी संपर्कात राहून आवश्यक माहिती घेवून आवश्यक बाबींची पूर्तता विहित मुदतीत करावी.

२४. **प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती डी.ई.बी., विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना सादर केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपला ऑनलाईन अर्ज व इतर अनुषंगिक कागदपत्रे आपण ऑनलाईन अर्जात निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहेत.** सदर अर्ज व इतर कागदपत्रे विहित मुदतीत सादर केली नसल्यास आपल्या प्रवेश, पात्रता व परीक्षेची पुढील कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल यांची नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार/समस्या विचारात घेतली जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२५. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश रद्द करावयाचा असल्यास डी.ई.बी., विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विहित मुदतीत शुल्क परतावाचे अर्ज या केंद्राच्या मुख्यालयात सादर करावेत. सदर अर्जाबरोबर प्रवेश अर्ज, ऑनलाईन शुल्काची पावती व बॅकेचा तपशील (बॅकेचे नाव, बॅकेतीलील खातेक्रमांक, शाखा, आय.एफ.सी. कोड, आगाउ पोहोच पावती) कागदपत्रे सादर करावीत.

२६ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम बदल झाले असून विद्यार्थ्यांनी प्रवेशापूर्वी याबाबत सविस्तर माहिती/मार्गदर्शन या केंद्राकडील विषयतज्ञ शिक्षक, अभ्यासकेंद्राकडील समन्वयक/शिक्षक यांच्याकडून घ्यावे. याबाबत काही अडचणी/समस्या असल्यास त्यांचे निरसन विषयतज्ञ शिक्षक, अभ्यासकेंद्राकडील समन्वयक/शिक्षक यांच्याकडून करून घ्यावे.

२७. यापूर्वीच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय व तृतीय वर्षाचा प्रवेश अर्ज व शुल्क हे त्यांनी त्यांच्या यापूर्वीच्या लॉगीन (युझर आयडी (ई-मेल आयडी)) मधून भरणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांनीही परीक्षा विभागाच्या मार्गदर्शक सूचेनुसार परीक्षा सत्रनिहाय परीक्षा अर्ज व शुल्क त्यांच्या लॉगीनमधून आपले विषय निश्चित करून स्वंत्रत अर्ज भरणेचा आहे. सदर अर्ज व शुल्क विहित मुदतीत न भरल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

Bhinde

उपकुलसचिव

जा.क्र. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र/ 147

दि. 3 0 AUG 2025